VOL- IX ISSUE- VI JUNE 2022 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.331 ISSN 2349-638x

# स्वावलंबी शिक्षण ही काळाची गरज

**प्रा. डॉ. अरूण बळीराम धालगडे**
संशोधक मार्गदर्शक, सहयोगी प्राध्यापक,
वाणिज्य विभाग प्रमुख
महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा जि.लातूर.

**प्रास्ताविक-**

सर्वसाधारण तळागाळातील बहुजनांच्या विद्यार्थ्यांना ताठ मानेनं व आत्मविश्वासाने शिक्षण घेता यावे म्हणून स्वावलंबी शिक्षण हे दिले गेले पाहिजे. स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद वाक्य कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या सातारा येथील रयत शिक्षण संस्थेला हे घोषवाक्य दिलेले. कर्मवीर अण्णांनी "कमवा आणि शिका" ही योजना सुरू केली आहे. ही योजना महाराष्ट्रातील अनेक विद्यापीठ आणि संस्थांनी स्विकारलेली दिसून येत आहे .बहुजन समाजातील गरजू गरीब विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून ही योजना सुरू केली होती.हा कर्मवीर अण्णांचा सामाजिक विशिष्ट दृष्टिकोन होता.स्वावलंबी शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी स्वतःच्या आर्थिक पायावर स्वतःचे शिक्षण पूर्ण करणे म्हणजेच विद्यार्थ्यांनी स्वतः शिकत असतानाच रिकामा वेळेत काही तास कोणत्याही संस्थेमध्ये विभागांमध्ये करावे व त्याच्या मोबदल्यात मधून स्वतःचा शिक्षणाचा , राहण्याचा व जेवणाचा खर्च भागविता येईल, अशीही “कमवा आणि शिका”योजना आहे. ही योजना विद्यार्थ्यांना आर्थिक स्वावलंबी बनवण्यासाठी उपयोगी पडू शकते . यायोजनेद्वारे विद्यार्थ्यांनी काही तास काम करावे लागते त्याचा आर्थिक मोबदला शैक्षणिक खर्च भागविण्यासाठी शिक्षण घेतानाच उपयोगी पडतो.या योजनेमुळे आई-वडिलांकडून कोणत्याही आर्थिक बाबी वरती विसंबून राहता येत नाही.घरची आर्थिक परिस्थिती ही अतिशय अडचणीची असते. या योजनेतील स्वावलंबी शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष व्यवहारिक ज्ञान प्राप्त होते व त्यातून एक आत्मविश्वास निर्माण होतो तो म्हणजे मी दिलेले कोणतेही काम अतिशय प्रामाणिकपणे व कष्टाने करू शकतो असा आत्मविश्वास या योजनेतून विद्यार्थ्यांनामिळालाजातो.ही योजना विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनतो. विद्यार्थ्यांना स्वावलंबी शिक्षण देणे ही आजच्या काळाची गरज आहे यसाठी अनेक नामांकित शिक्षण संस्था कडून स्वावलंबी शिक्षण देणे दिले जाणे गरजेचे आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :**

१.स्वावलंबी शिक्षण ही संकल्पना अभ्यासणे
२. स्वावलंबी शिक्षणाचे फायदे अभ्यासणे

**शोधनिबंधाचे माहिती चे स्तोत्र :**

शोध निबंधासाठी दुय्यम माहितीच्या मार्गाचा अवलंब केला गेला आहे यासाठी वेबसाईट संदर्भ पुस्तके इत्यादी दुय्यम साधनाचा वापर उपयोग केला गेला आहे.

स्वावलंबी शिक्षणाचे फायदेपुढील काही मुद्द्याच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**१. प्रात्यक्षिक ज्ञान :** विद्यार्थी हे अनुभवातून जास्त शिकत असतात. Man Makes Practices. माणूस अनुभवातून बनतो. मुले ही शिक्षण घेत असताना काही प्रात्यक्षिक ज्ञान / व्यवहारज्ञान घेऊन ती शिकली पाहिजेत. विद्यार्थ्यांना स्वतःच्या समस्या स्वतःहून सोडता येतात. स्वतःहून सोडवता आल्या पाहिजेत. विद्यार्थीना सतत अथक कष्ट करण्याची त्याची मानसिक तयारी होते. कोणतेही काम कमी प्रतीचे नसते. हे त्यास त्याचे मन सतत काम करण्यास प्रोत्साहन देत असते.कारण शिक्षण घेणेच हेच त्याचे मुख्य ध्येय असते. व्यवहारी ज्ञान मिळाल्यामुळे तो भविष्यात आत्मविश्वासाने त्या क्षेत्रात किंवा अन्य क्षेत्रात काम कार्य करण्यास तत्पर व तज्ञ होतो.

**२. स्वावलंबनाची सवय :** विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनातील सर्व कामे करण्याची सवय लागली पाहिजे.आपली सर्व कामे (कपडे धुणे) तो स्वतः करू शकत असल्यामुळे तो स्वावलंबी बनतो. दैनंदिन सर्व आर्थिक गरजा भागविण्यासाठी त्याला अर्थार्जन करण्याची सवय लागते. अनेक कौशल्य तो आत्मसात करतो आणि हे केवळ स्वावलंबी शिक्षणातून शक्य होऊ शकते. स्वावलंबी शिक्षणातून विद्यार्थ्यांना विविध कौशल्ये तो स्वतःच शिकत असतो. आज खऱ्या स्वावलंबी शिक्षणाची गरज बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना आहे.असे वाटते.आजच्या शिक्षण पद्धतीत विद्यार्थीना परावलंबी बनविले जात आहे पालकाच्या पैशातून विद्यार्थी शिक्षण घेत

असतो त्यामुळे त्याला पैशाचे महत्व कळत नाही,म्हणून स्वावलंबी शिक्षण म्हणजे स्वतः कमविने व शिकणे. अशी शिक्षणपद्धती अमलात आणली पाहिजे.

**३ कार्यसंस्कृती :** सध्या कोणासही काम मनापासून करावेसे वाटत नाही. ही कार्य संस्कृती वैयक्तिक प्रगतीसाठी व समाजासाठी हानिकारक आहे. स्वावलंबी शिक्षणामुळे सतत दिवसभर काहीना काही काम केले पाहिजे. अशी कार्यसंस्कृती निर्माण होते. त्या कामापासून त्यास अनुभवही मिळतो व आर्थिक मोबदला ही मिळतो.अशी कार्यसंस्कृती शिक्षणासोबत दिली गेली पाहिजे. आज शिक्षणाविषयी समाजामध्ये कमालीची नाराजी आहे ही नाराजी आपणाला कार्यसंस्कृती तून दूर करता येईल यासाठी सर्व घटकांनी एकत्र येऊन विचार करणे आवश्यक आहे आजच्या युगात स्वतःला कुटुंबाला टीकावयाचे / अस्तित्वात राहायचे असेल तर कार्यसंस्कृती जोपासणे आवश्यक आहे.ही काळाची गरज आहे

**४. आत्मसन्मान :** स्वावलंबी शिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या आत्मसन्मान वाढविण्यास मदत होते. विद्यार्थी पालकाच्या आर्थिक सहाय्यावर विसंबून न राहता स्वतः कार्यमग्न राहतो,यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होण्यास मदत होते. प्रत्येक विद्यार्थ्यांचा आत्मसन्मान जागृत करूनच गुणवान झाले पाहिजे. असे शिक्षण दिले पाहिजे. आपल्या आत्मसन्मानाची भावना सतत जागृत राहण्यास मदत होईल प्रत्येक विद्यार्थी आपले कार्य जिद्दीने जोमाने तो सतत करत राहील यातून स्वतःचा आत्मसन्मान वाढत असलेले पाहायला मिळते.

**५. दर्जेदार बाबीचा ध्यास :** कोणतेही कार्य हे दर्जेदार कसे होईल याची सतत शिकवण या स्वावलंबी शिक्षणातून दिली गेली पाहिजे. दर्जेदार बाबीचा सतत ध्यास घेऊन आपण आपली प्रगती केली पाहिजे. प्रत्येक काम हे दर्जेदार होण्यासाठी सातत्याने नियोजन केले पाहिजे. अशा प्रकारे नियोजनामुळे त्याच्या कामाचा दर्जा वाढलेला दिसून येतो.

**६. श्रमप्रतिष्ठा :** श्रमास प्रतिष्ठा मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उच्च गुणवत्ता मिळविण्याची अपेक्षा निर्माण होते. कारण तो स्वावलंबी असतो स्वतःच्या शिक्षणाचा खर्च तो रिकाम्या वेळेत काम करून तो मिळवत असतो उच्च गुणवत्ता ही त्याच्या अगदी नसानसात भरलेली असते. श्रम प्रतिष्ठातुन उच्च गुणवत्तेच्या ध्यास घेत असतो. स्वावलंबी शिक्षणातून उच्च गुणवत्ता कौशल्य प्राप्त तो करत असतो. स्वावलंबी शिक्षणातून निश्चितपणे अनेक कौशल्य आत्मसात करीत तो स्वतःचा व्यक्तिमत्त्वाचा विकास करीत असतो. त्यांनी मिळवलेल्या कौशल्यामुळे त्याचा आत्मविश्वास वाढतो. व आलेल्या अनुभवातून विद्यार्थी स्वतः आर्थिक स्वावलंबी बनू शकतो हे केवळ स्वावलंबी शिक्षणातून शक्य आहे.

**७.आत्मविश्वासात वाढ :** आजच्या जगात कोणतेही कार्य हे कमी प्रतीचे नाही हे विद्यार्थ्यास स्वावलंबी शिक्षणातून ज्ञात होते. कोणतेही कार्य हे मला करता येते हा आत्मविश्वास त्याला या स्वावलंबी शिक्षणातून प्राप्त करता येते.भविष्यात तो आर्थिक स्वावलंबी होऊ शकतो. हे या स्वावलंबी शिक्षणामुळेच शक्य आहे. कौशल्य प्राप्त केल्यामुळे संबंधितांची प्रतिष्ठा ही समाजामध्ये वाढत जाते. स्वावलंबी शिक्षणामुळे प्रत्येक श्रमास /कार्यास प्रतिष्ठा प्राप्त होते. याची जाणीव शिक्षण घेत असतानाच विद्यार्थ्यास मिळते, अशा जाणिवांमुळे विद्यार्थी सतत आपल्या कार्यात तत्पर लावून संबंधित संस्थेची सेवा करण्याचा प्रयत्न करीत असतो. आज अनेक विद्यार्थी अशा स्वावलंबी शिक्षणातून घडले आहेत त्यांना स्वतः स्वतःचे कुटुंब आर्थिक दृष्ट्या सुधारलेले आहेच आहे परंतु आपले मित्र नातेवाईक बंधू इत्यादींना सुद्धा स्वावलंबी शिक्षणाचे धडे देऊन समाजातील बहुजन समाजातील कुटुंबाची प्रगती साधलेली पाहायला मिळते. हे केवळ स्वावलंबी शिक्षणामुळेच शक्य झाले.

**८. व्यक्तिमत्त्वात बदल :** स्वावलंबी शिक्षणामुळे विचार बदलतात विचार बदलल्यामुळे स्वभाव बदलतो. स्वभाव बदलल्यामुळे सवयी बदलतात. सवयी बदलल्यास व्यक्तिमत्व बदलते व व्यक्तिमत्त्व बदलल्यास भविष्य घडविता येते हे स्वावलंबी शिक्षणातून शक्य झालेले पहावयास मिळत आहे.

**९. सतत प्रामाणिकपणे कार्यमग्न वृत्ती :** स्वावलंबी शिक्षणामुळे सतत कार्य कष्ट करण्याची सवय लागते सोपविलेले व स्वीकारलेले कार्य अतिशय कार्यक्षमपणे प्रभावीपणे व प्रामाणिकपणे करण्याची सवय स्वावलंबी शिक्षणातून मिळते. सतत कार्य करण्याची वृत्ती स्वावलंबी शिक्षणातून तयार होते त्यामुळे अशा वृत्तीमुळे स्वतःचा/ समाजाचा/ संस्थेचा विस्तार आणि विकास मोठ्याप्रमाणावर होण्यास मदत मिळते

**१०.जातिभेद दूर करण्यास मदत :** महाराष्ट्र राज्याच्या ग्रामीण भागातील पददलित आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या व जातीभेदाने पोखरलेला समाज स्वाभिमानी बनुन उन्नतीच्या मार्गावर वाटचाल करीत राहावा या हेतूने शिक्षणाबरोबरच स्वावलंबी शिक्षणाचा प्रसार केला जात आहे. समाजोन्नती च्या मूलभूत कार्यामुळे जनतेने त्यांना कर्मवीर ही उपाधी प्रदान केली आहे.

**११. उच्च शिक्षणाची सोय :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची सोय ठरण्यासाठी अनेक महाविद्यालय सुरू केली गेली या महाविद्यालयात कमवा आणि शिका योजना राबवून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणाची सोय केलेली दिसून येते सर्व स्तरांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची

संधी या स्वावलंबी शिक्षणामुळे उपलब्ध झालेली दिसून येत आहे. यामुळे अनेक विद्यार्थी स्वावलंबी बनलेले आहेत.

स्वावलंबी शिक्षणातून अनेक व्यक्तींनी उच्च पदव्या प्राप्त करून शिक्षण संस्थेत अनेक महत्त्वाची पदे भूषविलेली आहेत हे केवळ स्वावलंबी शिक्षणामुळेच शक्य झालेले आहे याचा सार्थ अभिमान वाटत आहे. स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद वाक्य थोर शिक्षण महर्षी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी या जगाला दिले त्यांना विनम्र अभिवादन करणे हे माझे कर्तव्य आहे.

**संदर्भ :**

१. www.esakhal.com,
२ .www.rayatrosed.com
३ .https://mr.m.wikipedia.org
४. https://mr.vikaspeidia.in